P.V.P.P.C.O.E.
Inward No. 1074
Date 29/12/2016

मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण विभाग
क्र.वि.क/६१/२०१६

डॉ. सुनिल पाटील
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट
मुंबई - ४०० ०२०

परिपत्रक :

विषय : "राष्ट्रीय एकता : सरदार पटेल" प्रदर्शन.
संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण.१११११/(प्र.क्र.१३७/१६)/समन्वय, दि.२२ डिसेंबर, २०१६

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, "राष्ट्रीय एकता : सरदार पटेल" हे प्रदर्शन मा.प्रधानमंत्री यांनी राष्ट्रीय विज्ञान केंद्र, नवी दिल्ली येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनी दि.३१ ऑक्टोबर, २०१६ रोजी उद्घाटन करून राष्ट्राला समर्पित केलेले आहे.

सदर प्रदर्शन हे नेहरू विज्ञान केंद्र (सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार), डॉ.इ.मोसेस रोड, वरळी, मुंबई - ४०० ०१८ येथे दि.०२-०७ जानेवारी, २०१७ च्या दरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते शुभारंभ होऊन, त्यानंतर ते एक महिन्यासाठी प्रदर्शित करण्यात येणार आहे.

तरी सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे आणि त्यांना सदर प्रदर्शन पाहण्यासाठी प्रोत्साहित करावे.

(डॉ. सुनिल पाटील)
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक : २९ डिसेंबर, २०१६.

प्रत : विद्यापीठ विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालयाचे व संस्थेचे प्राचार्य/संचालक यांना त्यांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर.

********************

N.B./Intranet Internet
30-12-2016
30/12

UNIVERSITY ISACD/ECD/201 26 DEC 2016 31632 OF MUMBAI

मा. प्रधानमंत्री यांच्या पुढाकाराने आयोजित " राष्ट्रीय एकता : सरदार पटेल " हे प्रदर्शन नेहरु विज्ञान केंद्र, वरळी, मुंबई येथे दि.०२ जानेवारी, २०१७ ते दि.०४ फेब्रुवारी, २०१७ दरम्यान प्रदर्शित होण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण -१११११/(प्र.क्र.१३७/१६)/समन्वय**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

तारीख: २२ डिसेंबर, २०१६.

DEPARTMENT OF STUDENTS' WELFARE Inward No. 1955 28/12/16 UNIVERSITY OF MUMBAI

संदर्भ :- निदेशक, नेहरु विज्ञान केन्द्र, वरळी, मुंबई यांचे अ. शा. प. क्र. : NSCM-11028/31/2016/ दिनांक.२८/११/२०१६.

शासन परिपत्रक -

आपणास कळविण्यात येते की, " राष्ट्रीय एकता : सरदार पटेल " हे प्रदर्शन मा.प्रधानमंत्री, यांनी राष्ट्रीय विज्ञान केन्द्र, नवी दिल्ली येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनी दि.३१ ऑक्टोबर, २०१६ रोजी उद्घाटन करुन, राष्ट्राला समर्पित केले आहे. हे प्रदर्शन सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांचा उपक्रम असून, मा.प्रधान मंत्री, यांच्या विचारातील कल्पना व मार्गदर्शनाखाली साकार झालेले आहे. सदर प्रदर्शनामध्ये सरदार पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या राजकीय एकीकरणाच्या कार्यात दिलेले योगदान हा संदेश देशातील विविध भागामध्ये पोहोचविण्यासाठी फिरते प्रदर्शनही सांस्कृतीक मंत्रालयाने तयार केले आहे. सदर प्रदर्शन हे गुजरात राज्यातील जुनागड येथे दि.९ नोव्हेंबर, २०१६ येथे मा. मुख्यमंत्री श्री.विजयभाई रुपाणी, गुजरात राज्य यांचे हस्ते प्रदर्शित करण्यात आले असता, त्या प्रदर्शनास जनतेकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळालेला आहे.

२. सदर प्रदर्शनाद्वारे देशातील विविध भागातील जनतेला सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेले अथक व निस्वार्थ भारताच्या राजकीय एकीकरणाचे कार्य ज्यामुळे त्यांना भारताचे लोहपुरुष म्हणून

ओळखण्यात येते याबाबतचे ज्ञान होण्यासाठी, सदर प्रदर्शन हे नेहरु विज्ञान केंद्र ( सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार ), डॉ. इ. मोसेस रोड, वरळी, मुंबई - ४०० ०१८ येथे दि.०२ - ०७ जानेवारी, २०१७ च्या दरम्यान मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते शुभारंभ होऊन, त्यानंतर ते एक महिन्यासाठी प्रदर्शित करण्यात येणार आहे. सदर प्रदर्शनास उत्कृष्ट प्रतिसाद मिळण्यासाठी मुंबई शहर व मुंबई उपनगरातील विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयातील विद्यार्थी व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रदर्शनाचा लाभ घेण्यास व प्रोत्साहित करण्यासाठी सदर बाब सर्वांच्या निदर्शनास आणण्याबाबत कार्यवाही करावी. यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेल्या निस्वार्थ कार्यामुळे राष्ट्रीय एकता वाढीस लागेल व प्रदर्शनाचा मूळ हेतू साध्य होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( रा.वि.जावध )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
१०. निवडनस्ती.